## नियमित दिवाणी मुकदमा नंबर ३०/२०१७ मधील नि.४२ वरील आदेश

**१.** अर्ज व म्हणणे वाचले.

**२.** अभिलेखातील कागदपत्रे पाहिली. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

**३.** प्रतिवादी नं.१ यांचे अर्जातील कथनांप्रमाणे त्यांना आवश्यक ती जुनी कागदपत्रे उपलब्ध न झाल्याने त्यांना विहित मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. प्रतिवादी नं.१ यांनी हे कथन शपथेवर केले आहे. त्यामुळे, प्रतिवादी यांनी दिलेले हे कारण संयुक्तीक वाटते. वादी यांनी हा दावा वाटणी होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यामुळे, प्रतिवादी नं.१ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. त्या करीता प्रतिवादी नं.१ यांचे विरुध्द झालेला विनाकैफियतीचा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. परंतु, प्रतिवादी नं.१ यांचे विरुध्द विनाकैफियतीचा आदेश दिनांक ०८/०२/२०१८ रोजी पारित करण्यात आला. त्यानंतर प्रतिवादी नं.१ हे नेमल्या तारखांना न्यायालयात येऊन देखील त्यांनी हा अर्ज आज रोजी ब–याच विलंबाने दाखल केला आहे. त्यामुळे, प्रतिवादी नं.१ यांना त्यांनी केलेल्या विलंबाबाबत रक्कम रुपये १०००/– (रुपये एक हजार मात्र) इतकी कॉस्ट होणे व ती कॉस्ट रक्कम वादी यांना अदा होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे.  सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे:

## आदेश

**१.** प्रतिवादी नं.१ यांचा हा अर्ज त्यांनी वादी यांना रक्कम रु.१०००/– (रुपये एक हजार मात्र) इतकी कॉस्ट अदा करण्याच्या अटीवर मंजूर करणेत येत आहे.

**२.** प्रतिवादी नं.१ यांचे विरुध्द दिनांक ०८/०२/२०१८ रोजी झालेला विनाकैफियतीचा आदेश रद्द करणेत येत आहे.

**३.** प्रतिवादी नं.१ यांनी वादी यांना कॉस्ट रक्कम अदा केल्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखात सादर करुन घेणेत यावी.

–

**दिनांक १५/०४/२०१९** **(डी.एम.हिंग्लजकर)**

**ठिकाण लांजा.** **न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, लांजा**

**जिल्हा रत्नागिरी**